<u>नि.दि.मु.क्र.१३५/२०१५ मधील नि.७३ वरील  आदेश</u>
**<u>CNRNo.MHST16000766-2015</u>**
<u>(तुकाराम दिनकर यादव वगैरे वि. गुणाबाई ज्ञानोबा यादव वगैरे)</u>

वादीचे वारसांतर्फे सदरचा अर्ज प्रतिवादी ७ यमुना यशवंत जगताप मयत झाल्याने प्रतिवादी क्र.७ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी ७ यमुना यशवंत जगताप या दिनांक ३०.५.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. हिंदु वारस कायद्याप्रमाणे त्यांना एक मुलगा व तीन मुली एवढेच वारस आहेत. त्याशिवाय त्यांना इतर कोणीही वारस नाहीत. कौटुंबिक अडचणीमुळे, घरगुती समस्यांमुळे प्रतिवादी क्र.७ चे वारसांची दुरुस्ती करता आली नाही. दुरुस्ती करण्यास उशीर झाला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.७ चे वारसांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. वादीने जाणीवपुर्वक वारसांची दुरुस्ती करण्यास उशीर केला नाही. सबब वारसांची दुरुस्ती करण्यास झालेला उशीर माफ करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ ने सदर अर्जावर नि.७८ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.७ या दिनांक ३०.५.२०२३ रोजी मयत झाल्या असून प्रतिवादी क्र.७ चे वारसांची दुरुस्ती करण्यास उशीर झाल्याने प्रतिवादी क्र.७ चे विरुद्ध अबेटमेंटचा आदेश करण्यात आला आहे. वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.७ ही वादी वारसांची जवळची नातेवाईक असून तिचे मृत्युची माहिती वादी यांना प्रथमपासुनच असतानाही त्यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. मयत प्रतिवादी क्र.७ चे विरुद्ध आवश्यक तजवीज न करता तिचे नाव दाव्यातुन कमी करणेकामी मागितलेली दुरुस्ती ही कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र.७ विरुद्ध दावा अबेट झाला असल्याने इतर प्रतिवादी यांना कायदेशीर बचाव प्राप्त झाला आहे. वादीने दाव्याचे कामी आवश्यक त्या तजवीज बरेच वर्षांपासुन केलेल्या नाहीत. वादी निव्वळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने दावा दाखल केला आहे व कामकाज लांबवित आहे. अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा वाटप होवून कब्जा मिळण्याकरिता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.७ यमुना यशवंत जगताप या दिनांक ३०.५.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना

अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. परंतू, प्रतिवादी क्र.७ या दिनांक ३०.०५.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत व वादीने सदरचा अर्ज २२.११.२०२३ रोजी दाखल केला आहे. वादीला प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता २ महिने २३ दिवसांचा उशीर झाला आहे. त्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. करीता, वादीचा अर्ज त्यांचेवर र.रु.५००/- खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम रुपये ३००/- प्रतिवादी क्र.२ ला देण्यात यावी.

२. रक्कम रुपये ३००/- वादीने प्रतिवादी क्र.२ ला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.७ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणेत यावा.

CHHAYA VIKRAM SHIRSAT
Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2024.06.14 17:03:18 +0530

ठिकाण - वाई. (सी. व्ही. शिरसाट)
दिनांक - १३.०६.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.